SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

# सुचना

## इमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त

## ऑगष्ट 2022

इमारत व सोयी सुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 25 ऑगष्ट 2022 रोज गुरुवारला दुपारी 1.00 वाजता इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सदस्यांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र.1:-** मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**विषय क्र.2:-** वादळवाऱ्यामुळे महाविद्यालयाच्या इमारतीच्या खचलेल्या भागाचे बांधकाम करणे व सभोवताल पडलेले लोखंडी सांगाडे उचलणे.

**विषय क्र.3:-** महाविद्यालयाच्या परिसरा सभोवती सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे.

**विषय क्र.4:-** मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | (sd) |
| २) प्रा. अरुण पिसे-समिती सदस्य | (sd) |
| 3) प्रा. रोहित चांदेकर-समिती सदस्य | (sd) |
| ४) प्रा. हुमेश्वर आनंदे-समिती सदस्य | (sd) |

समिती समन्वयक
प्रा. संदिप मेश्राम

प्राचार्य

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur. Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI
**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**
Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

**ईमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त**
**ऑगष्ट 2022**

आज दिनांक 25 ऑगष्ट 2022 रोज गुरुवारला दुपारी 1.00 वाजता महाविद्यालयाच्या इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची सभा मा.प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या सभेला समितीचे सर्व सभासद उपस्थित होते. चर्चा करून खालील ठराव मंजूर करण्यात आले.

| सभासदांचे नाव | सह्या |
| --- | --- |
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | ---------- |
| २) प्रा. अरुण पिसे-समिती सदस्य | ---------- |
| 3) प्रा. रोहित चांदेकर-समिती सदस्य | ---------- |
| ४) प्रा. हुमेश्वर आनंदे-समिती सदस्य | ---------- |
| ५) प्रा. संदिप मेश्राम-समन्वयक | ---------- |

**विषय क्र.1:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.1:-**

इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील सभा दिनांक 17 जानेवारी 2022 सोमवारला घेण्यात आली होती. त्या सभेचे इतिवृत्त समिती समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी उपस्थित सभासदांसमोर वाचून दाखविले. या इतिवृत्तावर औपचारिक चर्चा करून **ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.2:- वादळवाऱ्यामुळे महाविद्यालयाच्या इमारतीच्या खचलेल्या भागाचे बांधकाम करणे व सभोवताल पडलेले लोखंडी सांगाडे उचलणे.**

**ठराव क्र.2:-** आजच्या सभेमध्ये सभेचे समन्वयक प्रा. संदीप मेश्राम यांनी सभेत असे मत व्यक्त केले की दिनांक 18 जून 2022 रोजी आलेल्या चक्रीवादळामुळे महाविद्यालयाच्या स्लॅब वरील लोखंडी छत हे

हवेच्या दाबामुळे खाली पडले व त्यामुळे इमारतीच्या अनेक भागांना क्षती पोहोचून ते खचून गेलेले आहेत, करिता या खचलेल्या भागांना विटा व सिमेंटने जुडाई करून सिमेंट प्लास्टर करण्यात यावे असे मत मांडले तसेच जे लोखंडी अँगल महाविद्यालयाच्या परिसरात पडलेले आहेत त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना धोका संभवण्याची शक्यता आहे करिता सर्व लोखंडी अँगल जेसीबी द्वारे उचलून एका बाजूला ठेवण्यात यावे. या विषयावर सर्व सभासदांनी चर्चा केली व चर्चेअंती एकमताने इमारतीच्या खचलेल्या भागाचे बांधकाम व व लोखंडी अँगल जेसीबी द्वारे उचलून एका बाजूला ठेवण्यात यावं यावे असे एकमताने ठरले. ठराव **सर्वानुमते मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.3:- महाविद्यालयाच्या परिसरा सभोवती सुरक्षा भिंतीचे बांधकाम करणे.**

**ठराव क्र.3:-**

आजच्या सभेमध्ये प्रा. अरुण पिसे व प्रा. रोहित चांदेकर यांनी महाविद्यालयाच्या परिसरात बाहेरील गुरढोरं येऊन परिसरातील झाडांची नाशदूष करतात करिता महाविद्यालयाच्या सभोवताल सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यात यावे असे मत व्यक्त केले. यावर अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. धमानी यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समिती सोबत भिंतीचे बांधकामाकरीता लागणाऱ्या खर्चाच्या बाबतीत चर्चा करून निर्णय घेऊन सुरक्षा भिंतीचे बांधकाम करून घेऊ असे मत नोंदविले. ठराव **सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.4:- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**ठराव क्र. 4:-**

आजच्या सभेमध्ये शेवटी मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयात कोणत्याही सभासदांनी प्रश्न उपस्थित न केल्यामुळे मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

समिती समन्वयक

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur. Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

# सुचना

**इमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त**

**जानेवारी 2023**

इमारत व सोयी सुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 16 जानेवारी 2023 रोजी सोमवारला सकाळी 11.00 वाजता इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीची सभा प्राचार्यांच्या कक्षात मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सदस्यांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र.1:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**विषय क्र.2:- इमारतीच्या स्लॅबवरून पाणी गळती बद्दल चर्चा करणे.**

**विषय क्र.3:- महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांमध्ये डेस्क व बेंचेस ची व्यवस्था करणे.**

**विषय क्र.4:- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २) प्रा. अरुण पिसे-समिती सदस्य | |
| 3) प्रा. रोहित चांदेकर-समिती सदस्य | |
| ४) प्रा. हुमेश्वर आनंदे-समिती सदस्य | |

समिती समन्वयक
प्रा. संदिप मेश्राम

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI
**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**
Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

**ईमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त**
**जानेवारी 2023**

आज दिनांक 16 जानेवारी 2023 रोजी सोमवारला इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आली. या सभेला सर्व सभासद उपस्थित होते व पुढीलप्रमाणे विषयांवर चर्चा करून खालील ठराव मंजूर करण्यात आले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २) प्रा. अरुण पिसे-समिती सदस्य | |
| 3) प्रा. रोहित चांदेकर-समिती सदस्य | |
| ४) प्रा. हुमेश्वर आनंदे-समिती सदस्य | |
| ५) प्रा. संदिप मेश्राम-समन्वयक | |

**विषय क्र.1:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.1:-**

इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील सभा 25 ऑगष्ट 2022 रोज गुरुवारला घेण्यात आली होती. या सभेमध्ये जे ठराव घेण्यात आले होते त्या सर्व ठरावांचे इतिवृत्त समितीचे समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी आजच्या सभेत वाचून दाखवले. यावर साधक-बाधक चर्चा करून इतिवृत्ताला मंजुरी देण्यात आली.

**ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र.2:- इमारतीच्या स्लॅबवरून पाणी गळती बद्दल चर्चा करणे.**

**ठराव क्र.2:-**

आजच्या सभेमध्ये उपस्थित सभासदांमध्ये समिती समन्वयक प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी, इमारतीवरील लोखंडी टिनाचे छत वादळामध्ये घडून पडल्यानंतर स्लॅबमधून पाणी गळती होत आहे. त्याकरिता स्लॅब वर असलेल्या टाक्यांचे सिमेंट प्लास्टर करून पाईप फिटींग करणे व पाणी इमारतीच्या बाहेर काढणे असा विषय प्रस्तुत केला यावर मा. अध्यक्ष व समिती सभासदांनी होकार दर्शवला.

**ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र.3:- महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांमध्ये डेस्क व बेंचेस ची व्यवस्था करणे.**

**ठराव क्र.3:-**

आजच्या सभेमध्ये प्रा.अरुण पिसे यांनी वर्गखोल्यातील लाकडी डेस्क आणि बेंचेस कीड लागून तुटून पडलेले आहेत त्यामुळे डेस्क बेंचेस ची संख्या कमी झालेली असून विद्यार्थ्यांना बसण्याची गैरसोय निर्माण होत आहे. करिता निदान 50 लोखंडी डेक्स बेंचेस ची व्यवस्था करावी असे मत सभेमध्ये मांडले. सर्व सभासदांनी चर्चा करून होकार दर्शविला.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.4:- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**ठराव क्र.4:-**

आजच्या सभेमध्ये कोणत्याही सभासदाने माननीय अध्यक्ष यांची परवानगी घेऊन प्रश्न उपस्थित केला नाही करिता समन्वयक प्राध्यापक संदीप मेश्राम यांनी सर्व सभासदांचे आभार मानून अध्यक्षांना सभा समाप्त करण्याची विनंती केली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

समिती समन्वयक

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur